दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २२ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३६ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

शुक्रवार, दि. २२ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, षष्ठी सकाळी ६-२५ पर्यंत नंतर सप्तमी शनिवारच्या पहाटे ५-०५ पर्यंत, दिवस नक्षत्र- आश्लेषा रात्री २-०८ पर्यंत, चंद्र रास- कर्क रात्री २-०८ पर्यंत नंतर सिंह, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### शहरात ३६८ तडीपार

**पिंपरी** : शहरातील सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मोठ्या प्रमाणात तडीपारीच्या कारवाया केल्या आहेत. मागील वर्षभरात ३६८ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक तडीपार शहरातच वावरत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तडीपारीची कारवाई कागदावरच असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यापुढे तडीपार गुन्हेगार शहरात आढळल्यास संबंधित जबाबदार अंमलदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## सारांश वृत्त

### द्रमुकचे नेते सेल्वराज यांचा राजीनामा

**तिरुपूर** : द्रमुकचे नेते के. सेल्वराज यांनी गुरुवारी पक्षाचा राजीनामा दिला. तिरुपूर दक्षिणचे द्रमुकचे माजी आमदार आणि पक्षाच्या तिरुप्पूर मध्य जिल्हा युनिटचे सचिव, त्यांनी २३ एप्रिल रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पल्लाडम मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला. त्यांनी आरोप केला की, कष्टाळू कार्यकर्त्यांकडे आणि कार्यकर्त्यांकडे पक्ष नेतृत्वाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे.

### फसवणूक प्रकरणी दाम्पत्याला अटक

**फरीदाबाद** : परकीय चलन व्यापार आणि चित्रपट निर्मितीमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून सुमारे ३१ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फरीदाबाद पोलिसांनी पती-पत्नीला मुंबईतून अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फरिदाबादच्या सेक्टर ८८ मध्ये राहणाऱ्या अमित यांनी तक्रार दाखल केली आहे की, हिमांशू शर्मा फरिदाबादच्या एसजीएम नगर येथे "फॉरेक्स एज्युकेशन इन्स्टिट्यूट" नावाची कंपनी चालवतो आणि लोकांना परकीय चलन व्यापार आणि चित्रपटांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करतो.

### वादानंतर ट्रेनरवर हिंसक हल्ला

**बंगळुरू** : एका जिमशी संबंधित व्हॉट्सअॅप ग्रुपवर झालेल्या वादामुळे अर्धवेळ जिम ट्रेनर म्हणून काम करणाऱ्या एका तरुणावर झालेल्या हिंसक हल्ल्याप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. ही घटना मंगळवारी घडली असून ती सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. कथित फुटेजमध्ये हल्लेखोर दुचाकींवर पीडित व्यक्तीच्या घराजवळ येताना, त्याच्यावर हल्ला करताना आणि नंतर पळून जाताना दिसले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

# 30 जूनपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची घोषणा करत ३० जूनपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसंदर्भात आयोजित बैठकीनंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी बँकर्ससोबत कर्जवाटपाबाबतही स्वतंत्र बैठक घेण्यात आली. अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

मुख्यमंत्री म्हणाले की, जिल्हा सहकारी आणि ग्रामीण बँकांकडून राज्यातील सुमारे ६७ टक्के कृषी कर्जवाटप केले जाते, तर राष्ट्रीयकृत बँकांचा वाटा सुमारे २६ टक्के आहे. मात्र, राष्ट्रीयकृत बँकांकडून अपेक्षित प्रमाणात कर्जवाटप होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांनी कृषी कर्जवाटपाचे किमान ८० टक्के लक्ष्य पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना कर्ज देताना 'सिबिल स्कोअर'ची अट घालू नये आणि कोणत्याही प्रकारे अडचण निर्माण करू नये, अशा स्पष्ट सूचना बँकांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कर्जमाफीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व बँकांसोबत आवश्यक समन्वय सुरू असून माहिती कोणत्या स्वरूपात द्यायची यावरही चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यंदाच्या मान्सून हंगामाबाबतही मुख्यमंत्री फडणवीस यांनी चिंता व्यक्त केली. एल निनोचा प्रभाव आणि सरासरीपेक्षा कमी म्हणजेच ८८ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने पिकांवर ताण वाढण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेती नियोजन अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

#### दोन लाखाच्या मर्यादेत कर्जमाफी

● शेतकरी आणि सर्वपक्षीय दबावामुळे समितीचा अहवाल येण्यापूर्वीच मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २५ पर्यंत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखाच्या मर्यादेत कर्जमाफी देण्याची तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा केली होती. परदेशी समितीने कर्जमाफी संदर्भातील अहवालातून सरकारला अल्प आणि दिर्घकालीन उपयायोजना सूचविल्या आहेत. यामध्ये यापूर्वीच्या महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेचेच निकष नव्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेसाठी निश्चित करण्यात आले आहे.

## राज ठाकरे रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी निर्दोष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधातील २००८ मधील रेल्वे भरती आंदोलन आणि परप्रांतीय मारहाण प्रकरणात ठाणे न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. कल्याण रेल्वे स्थानकावरील हिंसाचार प्रकरणात राज ठाकरे यांना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले. जवळपास १८ वर्षे चाललेल्या या खटल्याचा निकाल गुरुवारी जाहीर करण्यात आला.

ठाणे मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाचे न्यायाधीश अभिजीत व्ही. कुलकर्णी यांनी निकाल देताना सरकारी पक्षाला आरोप सिद्ध करण्यास अपयश आल्याचे नमूद केले. आरोपी क्रमांक १ ते ७ घटनास्थळी प्रत्यक्ष उपस्थित होते किंवा त्यांनी हिंसाचारात सहभाग घेतल्याचे ठोस पुरावे सादर करण्यात आले नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयानंतर मनसे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हे प्रकरण २००८ मधील रेल्वे भरती परीक्षेच्या पार्श्वभूमीवर घडले होते. ऑल इंडिया रेल्वे भरती परीक्षेसाठी उत्तर भारतीय उमेदवार मोठ्या संख्येने महाराष्ट्रात, विशेषतः कल्याण परिसरात आले होते. त्या काळात मनसेकडून मराठी तरुणांच्या रोजगाराच्या प्रश्नावर आंदोलन करण्यात येत होते. राज ठाकरे यांनी परप्रांतीय उमेदवारांमुळे मराठी युवकांच्या नोकऱ्यांवर परिणाम होत असल्याचे सांगत भाषणे केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी कल्याण रेल्वे स्थानकावर उत्तर भारतीय विद्यार्थ्यांना मारहाण केल्याचा आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोप होता.

## बंगालमध्ये मदरशांमध्ये 'वंदे मातरम्' सक्तीचे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील सर्व मदरशांमध्ये 'वंदे मातरम्'चे गायन बंधनकारक करण्याचा निर्णय घेतल्यानंतर नव्या वादाला तोंड फुटले आहे. या निर्णयाला काही मुस्लिम संघटनांनी विरोध दर्शवला असून मदरशांच्या अंतर्गत कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारला नसल्याचा दावा करण्यात येत आहे.

पश्चिम बंगाल मदरसा शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि मान्यताप्राप्त मदरशांमध्ये वर्ग सुरू होण्यापूर्वी होणाऱ्या प्रार्थना सभेत 'वंदे मातरम्'चे गायन अनिवार्य करण्यात आले आहे. हा आदेश अल्पसंख्याक कल्याण आणि मदरसा शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व संस्थांना लागू राहणार आहे. या निर्णयावर प्रतिक्रिया देताना एजेयूपीचे अध्यक्ष हुमायूं कबीर यांनी मदरशांमध्ये 'वंदे मातरम्' गायले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. मदरशांच्या धार्मिक आणि अंतर्गत बाबींमध्ये सरकारने हस्तक्षेप करू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

राज्य सरकारने शालेय शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्येही सकाळच्या प्रार्थना सभेदरम्यान 'वंदे मातरम्'ची सर्व सहा कडवी गाणे बंधनकारक करणारे आदेश जारी केले होते. विद्यार्थ्यांनी दररोज वर्ग सुरू होण्यापूर्वी राष्ट्रीय गीताचे गायन करावे, असे निर्देश देण्यात आले होते.

### पाकिस्तान मार्फत मतभेद कमी करण्यासाठी प्रयत्न

# अमेरिकेकडून इराणला नवा युद्धविराम प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन/तेहरान** : पश्चिम आशियातील वाढता तणाव कमी करण्यासाठी अमेरिकेने इराणला पाकिस्तानमार्फत नवा युद्धविराम प्रस्ताव पाठवल्याची माहिती समोर आली आहे. राजनैतिक सूत्रांच्या माहितीनुसार, इराण सध्या या प्रस्तावाचा अभ्यास करत असून अद्याप अधिकृत प्रतिसाद देण्यात आलेला नाही. दोन्ही देशांतील मतभेद कमी करण्यासाठी विविध मध्यस्थांकडून प्रयत्न सुरू आहेत.

याच पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्या इराण दौऱ्याचीही चर्चा सुरू झाली आहे. पाकिस्तान या संपूर्ण प्रक्रियेत मध्यस्थाची भूमिका बजावत असल्याचे मानले जात आहे.

इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी यापूर्वी सांगितले होते की, इराण अमेरिकेसोबत प्रामाणिकपणे चर्चा करत असला तरी वॉशिंग्टनबाबत खोल संशय कायम आहे. इराणच्या सरकारी माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, इराणने मांडलेल्या १४ सूत्रीय प्रस्तावावर अमेरिकेचा प्रतिसाद प्राप्त झाला असून त्याचा सध्या आढावा घेतला जात आहे. बघाई यांनी स्पष्ट केले की, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांच्या तेहरान दौऱ्याचा उद्देश संवाद प्रक्रिया सुलभ करणे हा आहे. लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील संघर्ष थांबवणे हे सध्या इराणचे प्रमुख प्राधान्य असल्याचे त्यांनी नमूद केले. इराणने चर्चेदरम्यान काही महत्त्वाच्या मागण्या पुढे केल्या आहेत. त्यामध्ये गोठवलेला निधी मुक्त करणे, सागरी मार्गांवरील कथित अडथळे दूर करणे आणि इराणी जहाजांना लक्ष्य करणाऱ्या कारवाया थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

इराण गंभीरता आणि सकारात्मक भूमिकेतून चर्चा करत असला तरी अमेरिकेनेही प्रामाणिकपणा दाखवणे आवश्यक असल्याचे बघाई यांनी म्हटले. गेल्या दीड वर्षांतील अमेरिकेच्या भूमिकेमुळे विश्वासाचे वातावरण निर्माण झाले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "आमचे सैन्य पूर्ण सतर्क आहे," असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांची भेट घेतली. या बैठकीत प्रादेशिक परिस्थिती, इराण-अमेरिका अप्रत्यक्ष चर्चा आणि सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियन यांनीही नकवी यांच्यासोबत स्वतंत्र चर्चा केली. याचवेळी इस्रायली माध्यमांनी पाकिस्तानच्या मध्यस्थीमागे आर्थिक हितसंबंध असल्याचा दावा केला आहे. अहवालानुसार, इराणला अनुकूल करार घडवून आणण्यासाठी पाकिस्तान प्रयत्न करत असून त्याबदल्यात निर्बंधांमधून मिळणाऱ्या संभाव्य आर्थिक सवलतींचा फायदा पाकिस्तानलाही होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

### २०० विधानसभा मतदारसंघांवर विशेष लक्ष

# एकनाथ शिंदे यांचे २०२९ साठी स्वबळ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने संघटनात्मक बांधणीला वेग देत २०२९ च्या निवडणुकीसाठी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. पक्षाची ताकद तळागाळापर्यंत वाढवण्यासाठी राज्यभरात मोठ्या प्रमाणावर संघटनात्मक पुनर्रचना करण्यात येत असून २८८ पैकी २०० विधानसभा मतदारसंघांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या मोहिमेची जबाबदारी उद्योगमंत्री उदय सामंत आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. पक्ष संघटनेचे राज्यस्तरीय नियोजन चार प्रमुख विभागांमध्ये विभागण्यात आले असून प्रत्येक विभागाची जबाबदारी वरिष्ठ नेत्यांकडे देण्यात आली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे विदर्भ आणि मराठवाडा या महत्त्वाच्या भागांची जबाबदारी देण्यात आली आहे. तर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे मुंबई महानगर क्षेत्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील संघटन विस्ताराचे काम सोपवण्यात आले आहे.

उत्तर महाराष्ट्रातील पक्ष संघटन मजबूत करण्याची जबाबदारी मंत्री दादा भुसे आणि गुलाबराव पाटील यांच्याकडे देण्यात आली आहे. तर कोकणातील संघटनात्मक कामकाजाची धुरा माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. हे सर्व नेते आपल्या नियुक्त भागांमध्ये दौरे करून स्थानिक पातळीवरील संघटनात्मक स्थितीचा आढावा घेणार आहेत. शाखा बळकट करणे, कार्यकर्त्यांशी थेट संवाद वाढवणे आणि नव्या पदाधिकाऱ्यांची बांधणी करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे. शिवसेनेच्या या रणनीतीमागे आगामी राजकीय समीकरणांचे गणित असल्याचे मानले जात आहे. महायुतीमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत समन्वय राखत असताना भविष्यातील जागावाटप आणि राजकीय वाटाघाटींमध्ये पक्षाची भूमिका अधिक मजबूत राहावी, यासाठी शिवसेना संघटन वाढीवर भर देत असल्याचे बोलले जात आहे.

याचाच भाग म्हणून निवडलेल्या २०० मतदारसंघांमध्ये विशेष संपर्क अभियान राबवले जाणार आहे. प्रत्येक मतदारसंघात किमान १० हजार ते १५ हजार सक्रिय कार्यकर्त्यांचे जाळे उभारण्याचे लक्ष्य पक्षाने ठेवले आहे.

### वांद्रे हिंसाचार प्रकरणी १६ जणांना अटक

**मुंबई** : पश्चिम रेल्वेवरील वांद्रे स्थानकाजवळ दगडफेक करताना झालेल्या दगडफेकीप्रकरणी १६ जणांना अटक करण्यात आली असून १५० हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. वांद्रे स्टेशन ते वांद्रे टर्मिनस दरम्यान गरीब नगर भागात सुमारे ५२०० चौरस मीटर जमीन मोकळी करण्यासाठी मंगळवारी सुरू झालेल्या या मोहिमेला बुधवारी जोरदार प्रतिकाराचा सामना करावा लागला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना दोन वेळा लाठीचार्ज करावा लागला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांवर दगडफेक करण्यात आला. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

## खर्च प्रस्तावांसाठी नवे नियम लागू

### राज्य सरकारची कडक आर्थिक काटकसर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्याच्या तिजोरीवरील वाढता आर्थिक ताण लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने आर्थिक काटकसरीचे धोरण अधिक कठोर करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी निधीची उधळपट्टी आणि अनावश्यक खर्च टाळण्यासाठी वित्त विभागाने विविध प्रशासकीय विभागांकडून येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. यासंदर्भातील नवी नियमावली बुधवारी जारी करण्यात आली.

नव्या नियमांनुसार, अपूर्ण, त्रोटक किंवा अस्पष्ट माहिती असलेले प्रस्ताव आता थेट फेटाळले जाणार आहेत. कोणत्याही खर्चासाठी केवळ साधा प्रस्ताव पाठवून चालणार नसून त्यासोबत सविस्तर गोषवारा जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. वित्त विभागाने अर्थसंकल्पीय खर्चाची छाननी आणि नव्या मंजुरींसाठी तब्बल ८ स्वतंत्र नमुने निश्चित केले आहेत. आता सर्व प्रस्ताव हे याच विहित नमुन्यांमध्ये आणि निर्धारित प्रक्रियेनुसार सादर करणे आवश्यक राहणार आहे.

विभागांकडून येणाऱ्या प्रस्तावांमध्ये आवश्यक माहितीचा अभाव असल्याचे वित्त विभागाच्या निदर्शनास आले होते. अनेक योजना, प्रकल्प आणि नव्या पदांच्या मंजुरीसाठी पाठवण्यात येणाऱ्या प्रस्तावांमध्ये स्पष्ट कारणमीमांसा नसल्याने निर्णय प्रक्रियेला विलंब होत असल्याचेही समोर आले होते. अपूर्ण माहितीमुळे फायली पुन्हा संबंधित विभागांकडे पाठवाव्या लागत असल्याने वेळेचा अपव्यय होत होता. ही प्रक्रिया टाळण्यासाठी आणि मंजुरी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी नव्या नियमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. संबंधित प्रस्तावासाठी वित्त विभागाची मंजुरी का आवश्यक आहे, याचे स्पष्ट स्पष्टीकरण देणे बंधनकारक राहणार आहे.

### पाकिस्तानातील दहशतवाद्यांमध्ये भीतीचे वातावरण

# पुलवामाशी संबंधित कुख्यात हमजा बुरहान ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पाकिस्तानमध्ये आश्रय घेत भारतविरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांवर अज्ञात हल्लेखोरांकडून होत असलेल्या हल्ल्यांची मालिका सुरूच असून पुलवामा हल्ल्याशी संबंधित हमजा बुरहान याची पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. मुझफ्फराबाद येथे झालेल्या या हल्ल्यानंतर दहशतवादी संघटनांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, हमजा बुरहानवर सार्वजनिक ठिकाणी अज्ञात बंदूकधाऱ्यांनी गोळीबार केला. या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. गेल्या दोन वर्षांत पाकिस्तानमध्ये लपून बसलेल्या २० हून अधिक दहशतवाद्यांची आणि भारतविरोधी कारवायांमध्ये सहभागी व्यक्तींची अशाच प्रकारे हत्या झाल्याचे समोर आले आहे. या घटनांमध्ये समान प्रकार दिसून येत असल्याने सुरक्षा यंत्रणांचेही लक्ष वेधले गेले आहे. अज्ञात हल्लेखोर सार्वजनिक ठिकाणी येऊन लक्ष्य केलेल्या व्यक्तींवर गोळीबार करतात आणि त्यानंतर पसार होतात. हमजा बुरहानवरील हल्लाही याच पद्धतीने झाल्याचे सांगितले जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, ठार झालेल्या बहुतांश व्यक्ती या भारतातील मोठ्या दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या संघटनांशी निगडित होत्या. पाकिस्तान सरकारने या घटनांबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नसली, तरी लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदसारख्या संघटनांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, 'ऑपरेशन सिंदूर'नंतर या संघटनांना मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याची चर्चा आहे. वरिष्ठ नेते आणि महत्त्वाचे कार्यकर्ते लक्ष्य बनत असल्याने दहशतवादी संघटनांचे मनोबल खच्ची होत असल्याचे सुरक्षा तज्ज्ञांचे मत आहे. नव्या भरतीवरही त्याचा परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

हमजा बुरहान हा १४ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या पुलवामा हल्ल्याशी संबंधित असल्याचा आरोप होता. त्या हल्ल्यात सीआरपीएफचे ४० जवान शहीद झाले होते. जैश-ए-मोहम्मदने या आत्मघाती हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. या घटनेनंतर भारताने बालाकोट येथे हवाई कारवाई करत दहशतवादी तळांवर हल्ले केले होते. केंद्रीय गृह मंत्रालयाने २०२२ मध्ये हमजा बुरहानला दहशतवादी घोषित केले होते. त्याचे खरे नाव अर्जुमंद गुलजार दार असे होते.

गेल्या काही काळात पाकिस्तानमध्ये ठार झालेल्या प्रमुख दहशतवाद्यांमध्ये फैजल नदीम उर्फ अबू कताल, मौलाना काशिफ अली, मुफ्ती शाह मीर, रहीम उल्लाह तारिक, अकरम गाजी, ख्वाजा शाहिद, मौलाना जियाउर रहमान, कारी एजाज आबिद, दाऊद मलिक, अदनान अहमद, बशीर अहमद पीर, जहूर इब्राहिम, रियाज अहमद आणि खलिस्तानी दहशतवादी परमजीत सिंह पंजवार यांचा समावेश आहे.

## राघव चड्ढा यांना दिल्ली उच्च न्यायालयाचा धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भाजप खासदार राघव चड्ढा यांना व्यक्तिमत्व हक्कांशी संबंधित प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. सोशल मीडियावर नाव, फोटो आणि ओळखीचा गैरवापर होत असल्याचा दावा करत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, राजकीय नेत्यांवरील टीका, उपहास आणि व्यंगचित्रे ही लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहेत. केवळ एखाद्या व्यक्तीला ती टीका आवडत नाही किंवा त्यामुळे अस्वस्थता निर्माण होते म्हणून ती थांबवता येणार नाही.

न्यायमूर्ती सुब्रमणियम प्रसाद यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकेत राघव चड्ढा यांनी दावा केला होता की, राजकीय पक्ष बदलल्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्याविरोधात नियोजित मोहीम सुरू करण्यात आली असून त्यातून त्यांची प्रतिमा मलीन केली जात आहे.

यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवत म्हटले की, सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी घेतलेल्या राजकीय निर्णयांवर टीका होणे स्वाभाविक आहे. हे व्यक्तिमत्व हक्कांचे प्रकरण नसून, प्रतिमा मलीन झाल्याचे वाटत असल्यास संबंधित व्यक्ती मानहानीचा दावा दाखल करू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## संपादकीय

### रुपयाला सावरताना...



**रुपयाच्या मूल्यात सातत्याने होणारी घसरण रोखण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने व्याजदर वाढीसह 'फॉरेक्स स्वॅप'सारख्या पर्यायांची चाचपणी सुरू केली आहे. महागाईला आळा घालतानाच विकासदराला धक्का लागणार नाही, याची काळजी घेत रुपयाला सावरण्याची ही मध्यवर्ती बँकेची कसरत आगामी काळात अत्यंत आव्हानात्मक ठरणार आहे.**

आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची होत असलेली सातत्यपूर्ण घसरण ही सध्या देशाच्या अर्थव्यवस्थेपुढील एक मोठी डोकेदुखी बनली आहे. जागतिक भू-राजकीय तणाव, खनिज तेलाच्या किमतींमधील अस्थिरता आणि परकीय भांडवलाची माघार यांसारख्या बाह्य कारणांमुळे रुपयावर प्रचंड दबाव आला आहे. अशा परिस्थितीत 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ने रुपयाला सावरण्यासाठी आपल्या भात्यातील सर्व अस्त्रे बाहेर काढण्याची तयारी दर्शवली आहे. यात प्रामुख्याने धोरणात्मक व्याजदरात वाढ करणे आणि 'फॉरेक्स स्वॅप' यांसारख्या आक्रमक पर्यायांचा समावेश आहे. सध्याच्या चलनबाजारातील अस्थिरतेचे मूळ प्रामुख्याने अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेच्या, अर्थात 'फेडरल रिझर्व्ह'च्या धोरणांमध्ये दडले आहे. अमेरिकेत महागाई आटोक्यात आणण्यासाठी व्याजदर दीर्घकाळासाठी उच्च पातळीवर ठेवण्याचे संकेत 'फेड'ने दिले आहेत. जेव्हा अमेरिकेत व्याजदर वाढतात, तेव्हा जगभरातील गुंतवणूकदारांना तिथे अधिक सुरक्षित आणि चांगला परतावा मिळतो. परिणामी, 'परकीय संस्थात्मक गुंतवणूकदार' भारतासारख्या विकसनशील बाजारपेठांमधून आपला पैसा काढून तो अमेरिकेत गुंतवण्यास पसंती देते. या भांडवल प्रवाहाच्या उलट्या दिशेमुळे देशांतर्गत बाजारात डॉलरची टंचाई निर्माण होऊन त्याची मागणी वाढते आणि साहजिकच रुपयाचे मूल्य घसरते. याशिवाय, मध्यपूर्वेतील संघर्ष आणि जागतिक व्यापार साखळीतील तणावांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किमती चढेच राहिल्या आहेत. आपला देश गरजेच्या ८० टक्क्यांथून अधिक खनिज तेल आयात करत असल्याने, तेल खरेदीसाठी आपल्याला मोठ्या प्रमाणावर डॉलर्स मोजावे लागतात. यामुळे चालू खात्यातील तूट वाढते आणि रुपया आणखी कमकुवत होतो. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी रिझर्व्ह बँकेने प्रथम 'फॉरेक्स स्वॅप'चा मार्ग चोखाळण्याचा विचार सुरू केला आहे. हा एक अत्यंत प्रभावी परंतु तितकाच गुंतागुंतीचा आर्थिक व्यवहार मानला जातो. यामध्ये रिझर्व्ह बँक आपल्याकडील परकीय चलन गंगाजळीतून बाजारात डॉलर्स विकते आणि त्याच वेळी भविष्यातील एका निश्चित तारखेला ते डॉलर्स पुन्हा खरेदी करण्याचा करार करते. यामुळे बाजारात तात्काळ डॉलरची तरलता वाढते, ज्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण थांबण्यास मदत होते. 'फॉरेक्स स्वॅप'व्यतिरिक्त मध्यवर्ती बँकेच्या विचाराधीन असलेला दुसरा आणि सर्वांत संवेदनशील पर्याय म्हणजे थेट व्याजदरांमध्ये वाढ करणे. रुपयाला आकर्षक बनवण्यासाठी आणि परकीय गुंतवणूकदारांना देशात रोखून धरण्यासाठी व्याजदर वाढवणे हा जगभरातील मध्यवर्ती बँकांचा एक पारंपरिक उपाय मानला जातो. व्याजदर वाढल्यास भारतीय रोख्यांमधील परतावा वाढतो, ज्यामुळे परकीय गुंतवणूक पुन्हा देशाकडे आकर्षित होऊ शकते आणि डॉलरचा ओघ वाढून रुपया वधारू शकतो. देशांतर्गत पातळीवर आधीच महागाईचे सावट आहे आणि सामान्य माणसाचे बजेट कोलमडले आहे. अशा वेळी रेपो दरात वाढ केल्यास बँकांचे कर्ज महाग होईल. गृहकर्ज, वाहनकर्ज आणि वैयक्तिक कर्जाचे हप्ते वाढतील, ज्यामुळे ग्राहकांच्या क्रयशक्तीवर मोठा आघात होईल. उद्योगांसाठीही भांडवल उभारणी महाग होईल. रिझर्व्ह बँकेचे मुख्य उद्दिष्ट केवळ चलन स्थैर्य राखणे हे नसून, विकासदराला मारक न ठरता महागाई नियंत्रित ठेवणे हे आहे. त्यामुळे रुपयाला सावरण्यासाठी व्याजदर वाढवण्याचा निर्णय घेतल्यास अर्थव्यवस्थेच्या गतीला ब्रेक लागण्याची दाट शक्यता आहे. रुपयाचे अवमूल्यन सर्वसामान्यांसाठीही मारक असते. आयातित वस्तू, मग ते खनिज तेल असो, खाद्यतेल असो वा इलेक्ट्रॉनिक वस्तू. थेट महाग होतात आणि 'आयातित महागाई' देशात धडकते. दीर्घकालीन पातळीवर रुपया भक्कम करण्यासाठी भारताला निर्यातीत वाढ करणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हाच शाश्वत मार्ग आहे. केंद्र सरकारने 'उत्पादन संलग्न प्रोत्साहन' योजनेसारख्या उपक्रमांतून देशांतर्गत उत्पादनाला गती दिली असली, तरी थेट गुंतवणुकीला अधिक प्रोत्साहन देणे आणि पर्यायी इंधनांचा वापर वाढवणे यांसारख्या धोरणात्मक आघाड्यांवर काम करावे लागेल. थोडक्यात सांगायचे तर, चलनबाजारातील हे युद्ध केवळ रिझर्व्ह बँक आपल्या पातळीवर जिंकू शकत नाही; त्यासाठी सरकारच्या भक्कम वित्तीय धोरणांची आणि आर्थिक सुधारणांची जोड मिळणे तितकेच अपरिहार्य आहे.

# ऊर्जा अवलंबित्व कमी करणारा कोळशाचा वापर

**» भारतासारख्या विशाल अर्थव्यवस्थेला ऊर्जा-सुरक्षेसाठी आयातीवर विसंबून राहणे परवडणारे नाही. म्हणूनच कोळशाचा वापर 'कोल गॅसिफिकेशन'द्वारे रसायने व इंधननिर्मितीसाठी करण्याचा केंद्राचा निर्णय घेतला आहे.**



कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाच्या इंजिनाला गती देण्यासाठी आणि ते अव्याहतपणे सुरू ठेवण्यासाठी ऊर्जेची नितांत आवश्यकता असते. भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या देशाची ऊर्जेची भूक साहजिकच अफाट आहे. आपल्याकडे ४०१ अब्ज टनांहून अधिक कोळशाचे आणि ४७ अब्ज टन लिग्नाइटचे साठे आहेत. मात्र, इतकी विपुलता असूनही या 'काळ्या सोन्या'चा वापर आपण प्रामुख्याने एकाच कामासाठी करत आलो आहोत, ते म्हणजे औष्णिक वीजनिर्मिती! नैसर्गिक वायू (एलएनजी), अमोनिया, मिथेनॉल आणि युरिया यांसारख्या रसायनांसाठी व इंधनासाठी आपण आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहोत. म्हणूनच, केंद्र सरकारने नुकताच एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला आहे. कोळसा आणि लिग्नाइटच्या 'गॅसिफिकेशनला' प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने तब्बल ३७,५०० कोटी रुपयांच्या भव्य प्रोत्साहनपर योजनेला मंजुरी दिली आहे. देशातील कोळसा क्षेत्राला केवळ 'ऊर्जा इंधन' या पारंपरिक चौकटीतून बाहेर काढून त्याला 'औद्योगिक आणि ऊर्जा-सुरक्षेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ' बनवण्याच्या दिशेने टाकलेले हे आतापर्यंतचे सर्वांत मोठे पाऊल आहे. या नव्या योजनेअंतर्गत 'सरफेस कोल आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन'च्या नवीन प्रकल्पांसाठी यंत्रसामग्रीच्या खर्चाच्या २० टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत दिली जाणार आहे. २०२१ मध्ये सुरू झालेल्या 'नॅशनल कोल गॅसिफिकेशन मिशन'अंतर्गत २०३० पर्यंत १०० दशलक्ष टन कोळशाचे वायूकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी ७५ दशलक्ष टन गॅसिफिकेशन याच ताज्या योजनेतून साध्य करण्याचे सरकारचे नियोजन आहे.

'कोल गॅसिफिकेशन' म्हणजे नेमके काय आणि त्याचे अर्थव्यवस्थेसाठी फायदे काय, हे समजून घेणे येथे प्रस्तुत ठरेल. साध्या भाषेत सांगायचे तर, कोळसा भट्टीत थेट जाळण्याऐवजी, त्यावर विशिष्ट तापमान आणि दाबाखाली रासायनिक प्रक्रिया करून त्याचे 'सिंथेसिस गॅस' किंवा 'सिनगॅस'मध्ये रूपांतर केले जाते. हा 'सिनगॅस' म्हणजे हायड्रोजन, कार्बन मोनोऑक्साइड आणि मिथेन यांचे मिश्रण असते. या वायूचा वापर करून आपण कृत्रिम नैसर्गिक वायू, मिथेनॉल, अमोनिया, युरिया आणि इतर अनेक प्रकारची मौल्यवान पेट्रोकेमिकल्स तयार करू शकतो. सद्यस्थितीला आपण आपल्या देशाच्या गरजेच्या ५० टक्क्यांहून अधिक 'एलएनजी', १०० टक्के अमोनिया, ८० ते ९० टक्के मिथेनॉल आणि सुमारे २० टक्के युरिया आयात करतो. खतनिर्मितीपासून ते शहर वायू वितरणापर्यंत आणि प्लास्टिक उद्योगापासून ते औषधनिर्मितीपर्यंत सर्वत्र या घटकांची गरज असते.

आपण आपल्याच देशातील कोळशाचा वापर करून देशांतर्गत अमोनिया आणि युरिया तयार करू शकलो, तर आपली खतनिर्मिती आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतींच्या चढउतारांपासून मुक्त होईल. याचा थेट फायदा आपल्या कृषी क्षेत्राला आणि शेतकऱ्यांना होईल, तसेच सरकारवरील खत अनुदानाचा प्रचंड आर्थिक भारही लक्षणीयरीत्या हलका होईल. मिथेनॉलचा वापर पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी केल्यास खनिज तेलाच्या आयातीवरील खर्च कमी होईल. थोडक्यात सांगायचे तर, ही एक व्यापक औद्योगिक आणि ऊर्जा-सुरक्षा रणनीती आहे. यातून आयात कमी होऊन बहुमूल्य परकीय चलनाची अब्जावधी डॉलर्सची बचत तर होईलच, पण सोबतच देशात सुमारे अडीच ते तीन लाख कोटी रुपयांची नवी गुंतवणूक आकर्षित होऊन ५० हजारांहून अधिक थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याचीही शक्यता आहे.

आजच्या अत्यंत वेगाने बदलणाऱ्या आणि अस्थिर भू-राजकीय परिस्थितीत कोणत्याही देशाला आपल्या मूलभूत ऊर्जा आणि औद्योगिक गरजांसाठी दुसऱ्या देशांवर विसंबून राहणे परवडणारे आणि सुरक्षित नाही. त्यामुळे कोळशाचा केवळ वीजनिर्मितीसाठी होणारा एकांगी वापर थांबवून, त्यातून थेट रसायने आणि इंधने मिळवण्याचा हा दृष्टिकोन खऱ्या अर्थाने कालसुसंगत व स्वागतार्ह आहे. 'कोल गॅसिफिकेशन'चे हे धोरण केवळ आपल्या आयात-अवलंबित्वालाच लगाम घालणार नाही, तर भारताच्या 'आत्मनिर्भर' होण्याच्या प्रवासातील एक भक्कम टप्पाही ठरेल. या धोरणाची योग्य अंमलबजावणी झाल्यास, 'काळ्या सोन्या'चा हा नवा आणि अधिक उपयुक्त अवतार देशाच्या अर्थचक्राला नवी गती देईल, यात शंका नाही.

# जॉगर्स पार्क परिसरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

### सुमारे १५०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त; विकासासाठी यापुढेही कारवाया कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने प्रभाग क्रमांक ११ मधील जॉगर्स पार्क उद्यान परिसरातील अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सुमारे १५०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले. सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी उप आयुक्त अतुल पाटील, प्रशासन अधिकारी महादेव बोरे, बांधकाम परवानगी विभागाचे उप अभियंता किरण सगर व कनिष्ठ अभियंता प्रताप मोरे, तसेच उद्यान स्थापत्य व क्रीडा विभागाचे कनिष्ठ अभियंता वैभव विटकरे उपस्थित होते. तसेच बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीट निरीक्षक) साक्षी जांभुळकर, निकिता भोईटे, विकास वारभुवन आणि रूपक शिनगारे यांनीही कारवाईत सक्रिय सहभाग घेतला.

या कारवाईसाठी फ, अ आणि क क्षेत्रीय कार्यालयांमधील एकूण ५७ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले होते. याशिवाय १७ अतिक्रमण पोलीस, ६ जेसीबी मशीन, ८ मजूर आणि ३ वाहन चालक यांच्या मदतीने ही मोहीम पार पाडण्यात आली.

याबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, "शहरातील सार्वजनिक जागा, उद्याने आणि नागरिकांसाठी राखीव असलेली मोकळी मैदाने अतिक्रमणमुक्त ठेवणे ही महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी अशा कारवाया सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील," असे त्यांनी स्पष्ट केले.

# स्वच्छतेत अव्वल येण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि देशातील आदर्श शहर म्हणून विकसित करण्यासाठी नागरिकांच्या सक्रिय सहभागाची गरज असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.


स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत नागरिकांकडून मिळणारा अभिप्राय हा शहराच्या स्वच्छता व्यवस्थेच्या मूल्यमापनासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःहून पुढाकार घेत आपला अभिप्राय नोंदवून शहराला देशात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले की, "स्वच्छ आणि सुंदर शहर घडविणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ सर्वेक्षणात नागरिकांनी दिलेला अभिप्राय हा शहराच्या कामगिरीचे प्रतिबिंब ठरतो. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग नोंदवून पिंपरी-चिंचवडला देशातील स्वच्छ शहरांच्या अग्रक्रमावर नेण्यासाठी योगदान द्यावे."

नागरिकांनी अभिप्राय नोंदविताना शहरातील स्वच्छतेबाबतच्या उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

# शहर विकासासाठी माहिती ठरणार महत्त्वाची

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणनेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात पिंपरी-चिंचवड शहरात १६ मे २०२६ पासून करण्यात आली असून ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेदरम्यान नियुक्त प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करत आहेत. त्यामुळे नागरिकांनी प्रगणकांना योग्य आणि संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, तसेच स्व-नोंदणी केलेल्या नागरिकांनी आपला स्वयं-नोंदणी क्रमांक उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

घरयादी व घरगणना ही जनगणनेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. यामध्ये घरांची स्थिती, कुटुंबातील सदस्यांची माहिती आणि उपलब्ध नागरी सुविधांची नोंद केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासकामांचे नियोजन, सुविधा वितरण तसेच सामाजिक कल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करत असते.

उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले की, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अचूक माहितीमुळे भविष्यातील शहर विकासाला दिशा मिळणार आहे. अचूक माहिती संकलित झाल्यास शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक नियोजन अधिक परिणामकारकपणे करता येईल. महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, "जनगणना ही केवळ लोकसंख्येची नोंद नसून, शहराच्या भविष्यातील गरजा ओळखण्याचे प्रभावी माध्यम आहे. नागरिकांनी दिलेली अचूक माहिती विकास योजनांच्या योग्य अंमलबजावणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे प्रत्येकाने सकारात्मक सहभाग घेऊन जनगणना प्रक्रिया यशस्वी करावी." सचिन पवार यांनी आवाहन करताना सांगितले की, "घरयादी व घरगणना मोहिमेदरम्यान नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी. जनगणनेसाठी दिलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित ठेवली जाते. नागरिकांच्या सहकार्यामुळेच अचूक माहिती संकलित होऊन शहराच्या विकासाला गती मिळणार आहे."

# जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर काठीने हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मावळ** : मावळ तालुक्यातील दासवे येथे जमिनीच्या वादातून एका शेतकऱ्यावर काठीने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद बाजीराव वाघोले (वय ४५, रा. दासवे, ता. मावळ) यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणात योगेश दगडू वाघोले याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मे रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास गट क्रमांक ४२८ मधील शेतात बाजरी पिकाची कापणी सुरू असताना हा प्रकार घडला. आरोपीने ट्रॅक्टर चालकाला बांध फोडण्यास सांगितले. त्यावेळी फिर्यादी व त्यांच्या पत्नीने जमीन प्रकरण न्यायालयात सुरू असल्याने बांध फोडू नये, असे सांगितले. याचा राग आल्याने आरोपीने शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि लाकडी काठीने फिर्यादीच्या डाव्या हातावर मारहाण केली. या हल्ल्यात त्यांच्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाले असून शिरगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### शेती वाटणीच्या वादातून मारहाण

**मावळ** : पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात शेती वाटणीच्या जुन्या वादातून झालेल्या मारहाणीप्रकरणी सहाजणांविरुद्ध शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही घटना १९ मे रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास दावंबे परिसरात घडली. याप्रकरणी योगेश दगडू वाघोले (वय ३८, रा. दावंबे, ता. मावळ) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी स्वतःच्या शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने काम करत असताना आरोपींनी शेती वाटणीच्या कारणावरून वाद घालत मारहाण केली. आरोपी शरद वाघोले याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर नवनाथ वाघोले याने काठीने, यश वाघोले याने लोखंडी रॉडने आणि स्वप्नील वाघोले याने काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच रेखा वाघोले व छाया वाघोले यांनी शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. शिरगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना अटक केली आहे.

### भरधाव टेम्पोची स्कुटीला धडक

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवडमधील मोशी परिसरात भरधाव टाटा टेम्पोने स्कुटीला धडक दिल्याने एकजण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी रात्री आठच्या सुमारास देहू-आळंदी रोडवरील भारत माता चौकाजवळ हा अपघात झाला. संतोष नामदेव बोऱ्हाटे (वय ४९, रा. मोशी) यांनी तक्रार दिली आहे.

त्यांचे भाऊ स्कुटीवरून मोशी गावाकडे जात असताना मागून आलेल्या टाटा टेम्पो चालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवत स्कुटीला धडक दिली. या धडकेत स्कुटीस्वार खाली पडून त्यांच्या मनक्याला फ्रॅक्चर तसेच गंभीर दुखापत झाली. अज्ञात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### गांजाविक्री प्रकरणी युवक अटकेत

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने काळेवाडी परिसरात कारवाई करत एका युवकाला गांजासह अटक केली आहे. ही कारवाई १९ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मी निवास, भारत माता चौक, जय हिंद कॉलनी, काळेवाडी येथे गांजाविक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकत व्यंकटेश सुरेश नाईक (वय २६, रा. काळेवाडी) याला ताब्यात घेतले.

आरोपीकडून २५८ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत सुमारे १२ हजार ९०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इम्पोर्टेड फळांच्या दरात युद्धामुळे मोठी वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता सर्वसामान्यांच्या खिशावर जाणवू लागला असून, इम्पोर्टेड फळांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. पुण्यातील मोशी उपबाजारात सफरचंद, कीवी, ड्रॅगन फ्रूट, अवोकॅडो आणि ब्लूबेरी यांसारख्या परदेशी फळांचे दर गेल्या काही आठवड्यांत लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून येत आहे.

वाढलेले वाहतूक खर्च, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे घसरलेले मूल्य आणि आयात प्रक्रियेतील अडथळे यामुळे फळांच्या बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. मोशी उपबाजारातील फळविक्रेत्यांच्या माहितीनुसार, पूर्वी २०० ते २५० रुपयांपर्यंत मिळणारे कीवी आता ३५० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. अमेरिकन सफरचंदाच्या पेट्यांच्या किमतीत १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली असून, ड्रॅगन फ्रूट आणि ब्लूबेरीसारख्या फळांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. माल वेळेवर उपलब्ध होत नसल्याने मागणी आणि पुरवठ्यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. फळ विक्रेते संतोष शिंदे यांनी सांगितले की, युद्धामुळे आंतरराष्ट्रीय शिपिंग सेवा आणि कंटेनर वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे आयात खर्च वाढला असून त्याचा थेट परिणाम बाजारभावावर होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पुरंदर तालुक्यात २८ लाखांचे चंदन जप्त

**पुणे :** पुणे ग्रामीण एटीएसने पुरंदर तालुक्यात मोठी कारवाई करत सुमारे २८ लाख रुपये किमतीचे चंदन जप्त केले आहे. चंदनाच्या अवैध तस्करीविरोधातील ही महत्त्वाची कारवाई मानली जात असून, या प्रकरणी संबंधित संशयितांविरोधात पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पुरंदर तालुक्यात अवैधरीत्या चंदनाची वाहतूक आणि साठवणूक केली जात असल्याची माहिती पुणे ग्रामीण एटीएस पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून छापा टाकत मोठ्या प्रमाणावर चंदन जप्त केले. कारवाईदरम्यान काही संशयितांची चौकशी करण्यात आली असून, या प्रकरणामागे मोठे तस्करी रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता तपासली जात आहे. राज्यात मागील काही महिन्यांत चंदन तस्करीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. पुणे, जुन्नर आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग परिसरात यापूर्वीही मोठ्या प्रमाणात चंदन जप्त करण्यात आले होते. चंदनाला आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी असल्याने तस्करीचे प्रमाण वाढत असल्याचे तपास यंत्रणांचे म्हणणे आहे. या प्रकरणी वनविभाग आणि पोलिसांकडून संयुक्त तपास सुरू असून, जप्त करण्यात आलेल्या चंदनाचा स्रोत, वाहतूक साखळी आणि संभाव्य खरेदीदारांचा शोध घेतला जात आहे.

### परीक्षेत नापास झाल्याने आत्महत्या

**पुणे :** शिरूर तालुक्यातील आंबळे येथे दहावीच्या परीक्षेत नापास झाल्याच्या नैराश्यातून एका १७ वर्षीय शालेय विद्यार्थ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शिरूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेत सार्थक सतीश बेंद्रे (वय १७, रा. आंबळे, ता. शिरूर) या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. याबाबतची फिर्याद मयत विद्यार्थ्याचे वडील सतीश शिवाजी बेंद्रे यांनी शिरूर पोलिसांकडे दिली आहे.

### हवामान बदलाचा स्थलांतरित पक्ष्यांवर मोठा परिणाम

# अग्निपंखींनी उजनीकडे फिरवली पाठ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी देवकर :** बदलत्या हवामानाचा मोठा फटका यंदा उजनी धरण परिसरातील स्थलांतरित पक्ष्यांना बसला असून, राज्यभर प्रसिद्ध असलेले उजनीचे पक्षी पर्यटन यंदा जवळपास ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. देश-विदेशातून दरवर्षी मोठ्या संख्येने येणाऱ्या पक्ष्यांनी यंदा उजनीकडे पाठ फिरवल्याने परिसरातील पर्यटन व्यवसायही मंदावला आहे.

उजनीचे मुख्य आकर्षण मानले जाणारे अग्निपंखी अर्थात फ्लेमिंगो (रोहित पक्षी) यांची संख्या यंदा अत्यल्प राहिली आहे. दरवर्षी हजारोंच्या संख्येने दिसणारे हे पक्षी यंदा अवघ्या काहीशे संख्येनेच आढळून आले. सामान्यतः ऑक्टोबर-नोव्हेंबरपासून स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरू होते. उजनीतील पाणीपातळी फेब्रुवारीमध्ये घटू लागल्यानंतर



विविध देश-विदेशांतील पक्षी येथे दाखल होतात. मात्र, गेल्या वर्षी अवकाळी पावसामुळे पाणीपातळी उशिरा कमी झाली आणि त्यानंतरच्या तीव्र उष्णतेचा परिणाम पक्ष्यांच्या स्थलांतरावर झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

उजनी जलाशय परिसरात दरवर्षी फ्लेमिंगो, चित्रबलाक, राखी बगळा, तापस, करकोचा, चमचा, चक्रावक, प्लवर, ब्राह्मणी घार, गरुड, मत्स्यगरुड, जांभळी पाणकोंबडी, तुतारी, सुरय आदी विविध पक्ष्यांची मोठी वर्दळ असते. या पक्ष्यांच्या किलबिलाटाने आणि रंगीबेरंगी थव्यांनी पर्यटक आकर्षित होत असतात. मात्र, यंदा फेब्रुवारीपासून मेअखेरपर्यंत पक्ष्यांची प्रतीक्षा कायम राहिली असून, अत्यल्प संख्येतच पक्षी दाखल झाल्याचे दिसत आहे.

स्थानिक पर्यटन व्यवसायिकांच्या मते, हवामान बदलासोबतच उजनीतील वाढते प्रदूषण, पाणवनस्पतींचा नाश, लहान देशी माशांची घट आणि वाढती मानवी वर्दळ याचाही पक्ष्यांच्या आगमनावर परिणाम झाला आहे. पक्ष्यांच्या विसाव्याच्या टेकड्यांवर मच्छिमार, गुरे आणि पर्यटकांची वाढती गर्दी दिसत असून, काही ठिकाणी अंडी आणि पक्ष्यांची शिकार होत असल्याच्याही तक्रारी आहेत. यामुळे उजनी परिसरातील पर्यटन व्यवसायावरही मोठा आर्थिक परिणाम झाला आहे. पक्षीनिरीक्षणासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या घटल्याने स्थानिक व्यावसायिक आणि पर्यटन चालक अडचणीत आले आहेत.

## ८३ साखर कारखान्यांकडे ९३४ कोटींची एफआरपी बाकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** ऊस गाळप हंगाम २०२५-२६ मधील उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीची (एफआरपी) शेतकऱ्यांना द्यावयाची थकीत रक्कम प्रथमच एक हजार कोटी रुपयांच्या आत आली आहे. १५ मेअखेरच्या ताज्या अहवालानुसार, राज्यातील ८३ साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांचे ९३४ कोटी रुपये बाकी आहेत. तर १२७ साखर कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केल्याचे साखर आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी ११ मे रोजी थकीत एफआरपी असलेल्या ३९ साखर कारखान्यांची सुनावणी घेतली होती. त्यावेळी ९६ कारखान्यांकडे सुमारे १३०३ कोटी रुपयांची थकबाकी होती. सुनावणीदरम्यान काही कारखान्यांनी थकीत रक्कम भरण्यासाठी मुदत मागितली होती. मुदतीत रक्कम जमा न केल्यास जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्तांनी दिला होता. या इशाऱ्यानंतर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर ३६९ कोटी रुपये जमा केले. तसेच १३ साखर कारखान्यांनी एफआरपीची संपूर्ण रक्कम अदा केल्याचे समोर आले आहे. राज्यात एप्रिलअखेर १० कोटी ४५ लाख ६३ हजार टन ऊस गाळप पूर्ण झाले. ऊसतोडणी आणि वाहतूक खर्चासह शेतकऱ्यांना देय असलेली एकूण एफआरपी रक्कम ४० हजार ४४६ कोटी रुपये होती. त्यापैकी कारखान्यांनी प्रत्यक्षात ३९ हजार ५१२ कोटी रुपये, म्हणजेच ९७.६९ टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली आहे.

सद्यस्थितीत ८३ कारखान्यांकडे ९३४ कोटी रुपये थकीत असून, ही रक्कम वसूल करण्यासाठी आयुक्तालयाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी यांनी दिली.

## मेडिकल बंदचा रुग्णांना फटका




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव, शिंगवे, रांजणी तसेच परिसरातील बहुतांश मेडिकल दुकाने बुधवारी (दि. २० मे) बंद ठेवण्यात आल्याने रुग्णांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. सकाळपासूनच औषध दुकाने बंद असल्याने औषधे घेण्यासाठी आलेल्या नागरिकांची धावपळ उडाली. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, नियमित औषधे घेणारे रुग्ण आणि लहान मुलांच्या पालकांना याचा मोठा फटका बसला.

देशव्यापी "ऑल इंडिया केमिस्ट बंद"च्या पार्श्वभूमीवर जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आवाहनाला प्रतिसाद देत स्थानिक मेडिकल व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभाग घेतला. ऑनलाईन औषध विक्रीला विरोध, कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवास्तव सवलती थांबविणे तसेच बनावट औषध विक्रीवर नियंत्रण आणणे या प्रमुख मागण्यांसाठी हा बंद पुकारण्यात आला होता.

मेडिकल व्यावसायिकांनी सांगितले की, "रुग्ण सेवा हीच आमची ओळख असली तरी शासनाकडून सातत्याने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. ऑनलाईन औषध विक्रीमुळे छोट्या मेडिकल व्यावसायिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे हक्कांसाठी एकजुटीने लढण्याची वेळ आली आहे."

केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्टचे उपाध्यक्ष रमेश शेवाळे यांनी सांगितले की, "ही लढाई केवळ व्यवसायाची नसून केमिस्ट व्यवसायाच्या अस्तित्वाची, हक्कांची आणि भविष्यातील पिढ्यांच्या सुरक्षिततेची आहे."

दरम्यान, मेडिकल दुकाने बंद असल्याने अनेक नागरिकांना पर्यायी ठिकाणी जाऊन औषधे खरेदी करावी लागली. काही रुग्णांना आवश्यक औषधे वेळेत न मिळाल्याने अडचणींचा सामना करावा लागला.

## आंबेगाव तालुक्यात भीषण पाणीटंचाई

### ३४ हजार नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यात यंदा तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून तालुक्यातील २४ गावे आणि ८३ वाड्या-वस्त्यांमध्ये नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या तब्बल ३४ हजार ४० नागरिकांची तहान भागवण्यासाठी प्रशासनाकडून २२ टँकरच्या ७० हून अधिक फेऱ्या सुरू आहेत. पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे चित्र आहे.

तालुक्यातील कारेगाव, थुगाव, पारगाव तर्फे खेड, भावडी, कुरवंडी, पेठ, निघोटवाडी-दस्तुरवाडी, माळीण, पहाडदरा, वडगावपीर, कुशीरे बुद्रुक, बोरघर, फलोदे, तळेघर, पिंपरगणे, आसाणे, पंचाळे बुद्रुक, लोणी, तिरपाड, पाटण, मांदळेवाडी, आहुपे आणि फदालेवाडी-उगलेवाडी, धामणी या ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये पाणीटंचाई गंभीर बनली आहे.



या भागांतील गावठाणातील सुमारे ७ हजार ९०० नागरिक आणि वाड्या-वस्त्यांवरील २६ हजार १४० नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यासाठी प्रशासनाने २२ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. विशेष म्हणजे, आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात दरवर्षी मुसळधार पावसामुळे साडेतेरा टीएमसी क्षमतेचे डिंभे धरण भरते. या धरणामुळे तालुक्याच्या पूर्व भागासह नगर जिल्ह्यातील अनेक गावांना पिण्याचे आणि शेतीसाठी मुबलक पाणी मिळते. मात्र, ज्या आदिवासी भागात हे धरण आहे, त्या भागातील नागरिकांनाच पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने "धरण उशाला आणि कोरड घशाला" अशी परिस्थिती निर्माण झाल्याची भावना स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, फुलवडे, पोखरी, गंगापूर, गोहे खुर्द, जांभोरी, गोहे बुद्रुक आणि आमोंडी या सात ग्रामपंचायतींकडूनही टँकर सुरू करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यांना लवकरच मंजुरी दिली जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

पंचायत समिती सभापती कैलासबुवा काळे आणि गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांनी दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेल्या गावांनी तातडीने पंचायत समितीकडे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

## धोकादायक विहिरीला संरक्षक कठडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** मंचर-लोणी मार्गावरील भोजदरा (ता. आंबेगाव) येथे रस्त्यालगत असलेल्या धोकादायक विहिरीला अखेर संरक्षक लोखंडी कठडे बसविण्यात आले आहेत. पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या पुढाकारातून ही सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्याने वाहनचालक, शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

भोजदरा परिसरातील संबंधित विहीर रस्त्याच्या अगदी लगत असून, तिला कोणतेही संरक्षक कठडे किंवा जाळी नसल्याने येथे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, विहिरीच्या जवळच अंगणवाडी असल्याने लहान मुलांच्या सुरक्षेचाही प्रश्न उपस्थित होत होता. या मार्गावर दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असल्याने संभाव्य दुर्घटनेची शक्यता वाढली होती. ही बाब सहाय्यक पोलीस निरीक्षक



सचिन कांडगे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ पुढाकार घेत विहिरीभोवती मजबूत लोखंडी संरक्षक कठडे बसवून घेतले. त्यामुळे आता संभाव्य अपघात टळण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

यापूर्वीही सहाय्यक पोलीस निरीक्षक कांडगे यांनी पारगाव गावठाण परिसरातील लोखंडे माळी मळा तसेच दातखिळे मळा रस्त्यावरील धोकादायक विहिरींना संरक्षक कठडे बसविण्याचा उपक्रम राबवला होता. भोजदरा येथील विहिरीची सुरक्षा करण्यात आल्याने नागरिकांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. या उपक्रमामुळे वाहनचालक, ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालकांनी प्रशासनाचे आभार मानले असून, सार्वजनिक सुरक्षेसाठी अशाच प्रकारे धोकादायक ठिकाणांची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात आली आहे.

### वाढत्या दरांमुळे सासरकडील मंडळी चिंतेत

## 'धोंड्याचा मान' महागला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** प्रत्येक तीन वर्षांनी येणारा अधिक मास अर्थात धोंड्याचा महिना यंदा १७ मे ते १५ जूनदरम्यान साजरा होत आहे. या महिन्यात जावयाला सोने, चांदीचा धोंडा किंवा अन्य भेटवस्तू देण्याची परंपरा आहे. मात्र यंदा सोन्या-चांदीसह खाद्यतेल आणि इतर वस्तूंच्या वाढलेल्या किमतींमुळे "जावयाचा मान कसा राखायचा?" असा प्रश्न सासरकडील मंडळींसमोर उभा राहिला आहे.

हिंदू पंचांगानुसार अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' असेही म्हटले जाते. धार्मिक दृष्ट्या या महिन्याला विशेष महत्त्व असून भगवान विष्णूची उपासना, जप-तप, दानधर्म आणि व्रत-उपवास केले जातात. अनेक कुटुंबांमध्ये या काळात विवाहित मुलगी आणि जावयाला सासरी निमंत्रित करून त्यांचे आदरातिथ्य केले जाते. यालाच पारंपरिक भाषेत "धोंड्याचा मान" असे संबोधले जाते.

या परंपरेनुसार जावयाला सोन्या-चांदीचा धोंडा, अंगठी, चेन किंवा इतर भेटवस्तू दिल्या जातात. काही ठिकाणी ३३ अनारसे, तांब्या-पितळेची भांडी आणि विविध भेटवस्तू देण्याचीही प्रथा आहे. मात्र, यंदा वाढत्या महागाईने या परंपरेलाच आर्थिक फटका बसताना दिसत आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन, गॅस आणि खाद्यतेलाच्या किमती वाढल्या आहेत. त्यामुळे घरगुती बजेट कोलमडले असून गोडधोड पदार्थ बनवणेही खर्चिक ठरत आहे. सोने, चांदी तसेच तांब्या-पितळाच्या दरातही वाढ झाली आहे. बाजारात तांब्या-पितळाचे दर १,३०० ते १,८०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. तर सोन्याचे दर दीड लाखांच्या पुढे गेल्याचे सांगितले जात आहे. चांदीचे दरही दोन लाखांच्या घरात पोहोचल्याने पारंपरिक धोंडा देणे अनेकांसाठी कठीण बनले आहे.

## हवेली तालुक्यात तुकडेबंदीला हरताळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** हवेली तालुक्यात महसूल विभागातील कथित गैरव्यवहाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तालुक्यातील एका गावातील तलाठ्याने नियमबाह्य तुकडेबंदी फेरफार नोंदी मंजूर करण्यासाठी प्रती गुंठा ५० हजार रुपये घेतल्याची चर्चा महसूल वर्तुळात सुरू झाली आहे. या कथित प्रकारामुळे महसूल प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित गाव महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर असतानाही मोठ्या प्रमाणावर फेरफार नोंदी मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे संबंधित तलाठ्याची लवकरच बदली होणार असल्याने कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर नोंदी मंजूर करण्यात आल्याची चर्चा आहे. महसूल विभागाच्या डॅशबोर्डवर एप्रिल आणि मे महिन्यात फेरफार नोंदींची संख्या मोठ्या प्रमाणात



वाढल्याचे दिसून येत असल्याचे सांगितले जात आहे.

महसूल नियमांनुसार बागायती क्षेत्रात १० गुंठे हे प्रमाणभूत क्षेत्र मानले जाते. त्यामुळे त्यापेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे करणाऱ्या फेरफार नोंदींना परवानगी दिली जात नाही. मात्र, वरिष्ठांच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून संबंधित तलाठ्याने तुकडेबंदीतील फेरफार मंजूर केल्याचा आरोप आहे. या कथित व्यवहारासाठी "रेटकार्ड"च ठरवण्यात आल्याची चर्चा असून, एक गुंठ्यासाठी ५० हजार, दोन गुंठ्यांसाठी १ लाख आणि तीन गुंठ्यांसाठी दीड लाख रुपये घेतले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, "पैसे दिल्याशिवाय फेरफार नोंद होत नाही" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पैसे न दिल्यास फक्त खरेदीखत स्वीकारून फेरफार प्रक्रिया रखडवली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, काही फेरफार नोंदी ऑफलाईन पद्धतीने गाव दफ्तरी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तर काही दस्तांची नोंद केडगाव (ता. दौंड) येथील सब-रजिस्ट्रार कार्यालयातून ई-म्युटेशन प्रणालीद्वारे ऑनलाईन करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. दस्तांमध्ये "हिश्श्याची अंशतः विक्री" किंवा "पैकी क्षेत्रातील अंशतः विक्री" असा उल्लेख टाळण्यात आल्याचीही चर्चा महसूल विभागात सुरू आहे. या प्रकरणाची अधिकृत चौकशी झाल्यास मोठा गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व विभाग आणि संबंधित ठेकेदारावर गंभीर आरोप

# भीमाशंकर विकासकामांच्या संथगतीवर संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** श्री क्षेत्र भीमाशंकर येथे सुरू असलेल्या विकास आराखड्याच्या कामांवरून स्थानिक ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व विभाग आणि संबंधित ठेकेदारावर गंभीर आरोप केले आहेत. गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेली कामे नियोजनातील त्रुटी, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आणि कंत्राटदाराच्या संथ कार्यपद्धतीमुळे रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



भीमाशंकर मंदिर परिसरातील सभामंडपाचे काम विक्रमी कालावधीत पूर्ण करून त्याची गिनीज बुकमध्ये नोंद करण्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला होता. यासाठी शासन स्तरावर वारंवार बैठका घेण्यात आल्या. मात्र प्रत्यक्षात कामाच्या गतीअभावी ही संधी हुकल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ मे रोजी मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे जाहीर केले असले, तरी मंदिर परिसरातील अनेक कामे अद्याप अपूर्ण असल्याची स्थिती आहे. विशेषतः पायरी मार्ग आणि सभामंडपाच्या कामांमध्ये अपेक्षित वेग नसल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठेकेदाराकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. तसेच कामाच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्व विभाग किंवा ठेकेदाराचे वरिष्ठ अधिकारी नियमित उपस्थित राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. केवळ सुपरवायझर जीओ-टॅग केलेले फोटो वरिष्ठांना पाठवत असून, त्याच्या आधारे कामाची पाहणी केल्याचे दाखवले जात असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे.

दरम्यान, भीमाशंकर परिसर हा अतिवृष्टीसाठी ओळखला जातो. मंदिर परिसर आणि पायरी मार्गावर मोठ्या प्रमाणात राडारोडा आणि माती पडून असल्याने पावसाळा सुरू झाल्यास ती माती मंदिर परिसरात वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या भागाच्या भौगोलिक परिस्थितीकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. भाविक आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून विकासकामे जलदगतीने पूर्ण करावीत, अशी मागणी केली आहे.

## ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन तातडीने द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** ग्रामरोजगार सहाय्यकांचे गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेले मानधन तातडीने अदा करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जुन्नर तालुका किसान सभेच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भातील निवेदन गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार यांना देण्यात आले.

यावेळी किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. या चर्चेदरम्यान ग्रामरोजगार सहाय्यकांचे थकीत मानधन उद्यापासून वितरित करण्यात येईल, असे आश्वासन गटविकास अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती किसान सभेकडून देण्यात आली. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत मागील चार वर्षांपासून गाई-गोठा धारक शेतकऱ्यांची प्रलंबित रक्कमही तत्काळ देण्याची मागणी करण्यात आली. यावर आठ दिवसांत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करण्यात येतील, असे गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितले.

निवेदन देताना किसान सभेचे अध्यक्ष कोंडीभाऊ बांबळे, सचिव मुकुंद घोडे, सहसचिव नारायण वायळ, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव गणपत घोडे, पांडुरंग ढेंगळे, संदीप शेळकंदे, कल्याणी राऊत, किरण हिले आणि गणेश ताजणे उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### केरळचे आमदार शपथविधीसाठी दाखल

**तिरुवनंतपुरम:** नवनिर्वाचित आमदार गुरुवारी पायी, सायकल किंवा वाहनाने अशा विविध माध्यमांनी शपथविधीसाठी केरळ विधानसभेत दाखल झाले. भाजपचे तीन आमदार राजीव चंद्रशेखर, व्ही. मुरलीधरन आणि बी. बी. गोपाकुमार त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थकांसह पायी विधानसभा संकुलात पोहोचले.




### रस्ते अपघातात पिता-पुत्राचा मृत्यू

**चंदाउली (उत्तर प्रदेश) :** येथे एका अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने एक पुरुष आणि त्याच्या १० वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. बुधवारी रात्री रमेश गुप्ता (४०) आणि त्यांचा मुलगा शिवांश हे दुर्गावतीहून वाराणसीला जात असताना हा अपघात झाला, अशी माहिती चंदौली कोतवाली पोलीस ठाण्याच्या स्टेशन हाऊस ऑफिसर बिंदेश्वरी दुबे यांनी दिली. त्या दोघांना वाराणसी येथील ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले होते, जिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, असे दुबे यांनी सांगितले. ते दोघे बिहारचे रहिवासी होते, असेही त्यांनी पुढे सांगितले.

### पार्टीत विनयभंग झाल्याचा आरोप

**बंगळूर :** एका २० वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीने आरोप केला आहे की, येथील एका पार्टीदरम्यान एका व्यक्तीने तिचा विनयभंग करून बलात्काराचा प्रयत्न केला आणि नंतर त्याने व त्याच्या साथीदारांनी तिच्या मित्रांना मारहाण करून गंभीर परिणामांची धमकी दिली, अशी माहिती पोलिसांनी दिली. पीडित मुलगी मूळची केरळची असून, ती येथील एका कॅफेमध्ये अर्धवेळ काम करत होती, असे त्यांनी सांगितले. तक्रारीत, महिलेने आरोप केला आहे की, ११ मे च्या रात्री ती आणि इतर जण काम संपवून कॅफेच्या मालकाने आयोजित केलेल्या पार्टीला गेले असताना ही घटना घडली.

## स्वतःच्या लोकांवर बॉम्ब टाकणाऱ्या देशाकडून घृणास्पद कृत्ये अपेक्षितच

# भारताचा पाकिस्तानवर युनोत घणाघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर भारताने पाकिस्तानवर अत्यंत कठोर शब्दांत टीका करत दहशतवाद, मानवाधिकार आणि सीमापार हिंसाचाराच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. "स्वतःच्या नागरिकांवर बॉम्बहल्ले करणाऱ्या देशाकडून अशा घृणास्पद कृत्यांची अपेक्षा नवीन नाही," अशा शब्दांत भारताने पाकिस्तानला सुनावले.

संयुक्त राष्ट्रसंघातील चर्चेदरम्यान पाकिस्तानने जम्मू-काश्मीर आणि मानवाधिकारांचा मुद्दा उपस्थित करत भारतावर आरोप करण्याचा प्रयत्न केला. त्यावर प्रत्युत्तर देताना भारतीय प्रतिनिधींनी पाकिस्तानचा इतिहास, दहशतवादी संघटनांना मिळणारे संरक्षण आणि देशांतर्गत परिस्थितीचा उल्लेख करत तीव्र प्रतिक्रिया दिली. भारतीय प्रतिनिधींनी स्पष्टपणे म्हटले की, पाकिस्तानने अनेक दशकांपासून दहशतवादाला राज्य प्रायोजित पाठबळ दिले आहे. अशा देशाने मानवाधिकार आणि शांततेवर भाष्य करणे म्हणजे आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप भारताने केला.

भारताने संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानमधील अंतर्गत परिस्थितीकडेही लक्ष वेधले. विशेषतः बलुचिस्तान आणि इतर भागांतील हिंसाचाराचा संदर्भ देत, "स्वतःच्या नागरिकांवर हवाई हल्ले करणाऱ्या आणि विरोधकांना दडपणाऱ्या देशाने इतरांना नैतिकतेचे धडे देऊ नयेत," असे भारताने ठामपणे सांगितले. भारतीय बाजूने असा मुद्दा मांडण्यात आला की, पाकिस्तानची जमीन अनेक दहशतवादी संघटनांसाठी सुरक्षित आश्रयस्थान बनली आहे. या संघटनांचा वापर शेजारी देशांमध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी केला जात असल्याचेही भारताने नमूद केले. संयुक्त राष्ट्रसंघातील चर्चेत भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केले की जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य आणि अंतर्गत भाग आहे. पाकिस्तानने वारंवार हा मुद्दा आंतरराष्ट्रीय मंचावर उपस्थित करून वास्तव लपवण्याचा प्रयत्न केला, तरी भारताची भूमिका कायम ठाम राहील, असे भारतीय प्रतिनिधींनी सांगितले. भारताने पाकिस्तानला दहशतवादाविरोधात ठोस आणि दृश्यमान कारवाई करण्याचे आवाहनही केले. "दहशतवादाला पाठिंबा देणे आणि त्याच वेळी शांततेची भाषा करणे, हा पाकिस्तानचा दुटप्पीपणा आहे," अशी टीकाही करण्यात आली.

भारताच्या या कठोर वक्तव्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघात भारत-पाकिस्तान संबंधांमधील तणाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. गेल्या काही वर्षांत दहशतवाद, सीमापार घुसखोरी आणि काश्मीर प्रश्नावरून दोन्ही देशांमध्ये सातत्याने वाद सुरू आहेत.

राजनैतिक विश्लेषकांच्या मते, भारताने आता आंतरराष्ट्रीय मंचांवर पाकिस्तानविरोधात अधिक आक्रमक आणि थेट भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः दहशतवादाच्या मुद्द्यावर जागतिक पातळीवर पाकिस्तानला एकटे पाडण्याचा भारताचा प्रयत्न अधिक तीव्र होत असल्याचे मानले जात आहे.

## रांचीत २७ माओवाद्यांचे आत्मसमर्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांची :** झारखंडमध्ये नक्षलविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले असून गुरुवारी रांची येथे तब्बल २७ माओवाद्यांनी पोलिसांसमोर शस्त्रे टाकून आत्मसमर्पण केले. झारखंडचे पोलीस महासंचालक तदाशा मिश्रा यांच्या उपस्थितीत हा आत्मसमर्पण सोहळा पार पडला. बंदी घालण्यात आलेल्या सीपीआय (माओवादी) संघटनेशी संबंधित हे अतिरेकी विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये वाँटेड होते. झारखंड पोलीस, झारखंड जग्वार, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि इतर सुरक्षा दलांच्या संयुक्त कारवाईमुळे त्यांनी हिंसेचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन नवजीवन' अंतर्गत आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या मोहिमेद्वारे शासनाकडून पुनर्वसन, रोजगार, आर्थिक मदत आणि सामाजिक पुनर्स्थापनेच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२६ या वर्षात आतापर्यंत २२ माओवादी चकमकीत ठार झाले असून ४४ जणांना अटक करण्यात आली आहे, तर २९ जणांनी आत्मसमर्पण केले आहे. गुरुवारी झालेल्या सामूहिक आत्मसमर्पणामुळे राज्यातील नक्षल चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

डीजीपी तदाशा मिश्रा यांनी सांगितले की, राज्यातून माओवादाचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी सुरक्षा दलांचे संयुक्त प्रयत्न सुरू राहतील. आत्मसमर्पण केलेल्या सर्व माओवाद्यांचे पुनर्वसन शासनाच्या धोरणानुसार केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सीआरपीएफचे आयजी साकेत सिंग यांनी उर्वरित माओवाद्यांना हिंसेचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले. "ज्यांनी अजून आत्मसमर्पण केलेले नाही, त्यांनी शस्त्रे खाली ठेवून शांततेचा मार्ग स्वीकारावा," असे ते म्हणाले.

## 'कॉकरोच जनता पार्टी'चे अकाउंट ब्लॉक?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून प्रचंड चर्चेत असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी' संदर्भात मोठी घडामोड समोर आली आहे. इन्स्टाग्रामवर भाजपच्या अधिकृत अकाउंटपेक्षा अधिक फॉलोअर्स मिळवल्यानंतर काही तासांतच सीरेजीचे एक्स अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडियावर नव्या चर्चेला तोंड फुटले आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर एक स्क्रीनशॉट शेअर करत, "अपेक्षेप्रमाणे कॉकरोच जनता पार्टीचे अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आले आहे," अशी प्रतिक्रिया दिली. त्यांच्या या पोस्टनंतर समर्थक आणि विरोधकांकडून विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या. मात्र, एक्स कंपनीकडून किंवा कोणत्याही अधिकृत सरकारी संस्थेकडून यासंदर्भात अद्याप अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

मीडिया अहवालांनुसार, 'कॉकरोच जनता पार्टी'ने इन्स्टाग्रामवर १० दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स मिळवत भाजपच्या अधिकृत अकाउंटलाही मागे टाकल्याचा दावा केला जात आहे. भाजपच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर सुमारे १२ दशलक्ष फॉलोअर्स असल्याचे सांगितले जाते. अल्पावधीत या लोकप्रियतेमुळे सीजेपी चर्चेचा विषय ठरली आहे.

'कॉकरोच जनता पार्टी' हा पारंपरिक राजकीय पक्ष नसून व्यंग, मीम संस्कृती आणि डिजिटल आंदोलन यांचे मिश्रण असलेली सोशल मीडिया मोहीम मानली जाते. बेरोजगारी, पेपरफुटी, राजकीय वातावरण, तरुणांमधील नाराजी आणि सोशल मीडिया संस्कृती यांसारख्या मुद्द्यांवर ही मोहीम मोठ्या प्रमाणावर चर्चेत आली आहे. विशेषतः तरुणांमध्ये या पेजची लोकप्रियता झपाट्याने वाढताना दिसत आहे.

## विजय सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) सरकारने गुरुवारी मोठा मंत्रिमंडळ विस्तार करत २३ नव्या मंत्र्यांचा समावेश केला. या विस्तारामुळे राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून जवळपास सहा दशकांनंतर काँग्रेसचे तमिळनाडू मंत्रिमंडळात पुनरागमन झाले आहे. लोक भवन येथे सकाळी १० वाजता झालेल्या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

या विस्तारानंतर मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यसंख्या ३३ वर पोहोचली असून, मंत्रिमंडळाची अधिकृत मंजूर संख्या ३५ आहे.

नव्या मंत्र्यांमध्ये विविध प्रादेशिक आणि सामाजिक प्रतिनिधित्वाला प्राधान्य देण्यात आले आहे. मंत्रिमंडळात समाविष्ट झालेल्या प्रमुख नावांमध्ये श्रीनाथ (थुथुकुडी), कमली एस. (अविनाशी), सी. विजयालक्ष्मी (कुमारपालयम), आर.व्ही. रंजितकुमार (कांचीपुरम), विनोथ (कुंभकोणम), राजीव (थिरुवदनई), बी. राजकुमार, व्ही. राजकुमार, जेगडेश्वरी के. (राजापालयम) आणि एम. विजय बालाजी (इरोड पूर्व) यांचा समावेश आहे. याशिवाय लोगेश तमिलसेल्वन डी., विजय तमिलन पार्थिबन ए., रमेश, कुमार आर., थेनारासू के., व्ही. संपत कुमार, मोहम्मद फरवास जे., एन.टी. विल्मर आणि विघ्नेश के. यांनाही मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे.

या मंत्रिमंडळ विस्तारातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे काँग्रेस आमदार एस. राजेश कुमार (किल्लूर) आणि पी. विश्वनाथन (मेलूर) यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. यामुळे जवळपास ६० वर्षांनंतर तामिळनाडूच्या सत्ताकारणात काँग्रेसला पुन्हा थेट सत्ता सहभाग मिळाला आहे. विश्लेषकांच्या मते, विजय यांच्या नेतृत्वाखाली तयार होत असलेल्या नव्या राजकीय समीकरणात काँग्रेसचा समावेश हा आगामी राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, इंडियन युनियन मुस्लिम लीगने सरकारमध्ये सहभागी होण्यास तत्त्वतः सहमती दर्शवली आहे. मात्र मंत्रीपदासाठी अद्याप उमेदवार निश्चित करण्यात आलेला नाही. तसेच विदुथलाई चिरुथैगल कची पक्ष सत्ताधारी आघाडीत अधिकृतपणे सामील व्हायचे की नाही, यावर अजूनही अंतर्गत चर्चा करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## कोलकात्यात एनआयएची मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** देशाच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारा एक मोठा हेरगिरीचा कट एनआयएने उधळून लावला आहे. भारतीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील आणि गोपनीय माहिती पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेला पुरवल्याप्रकरणी झफर रियाझ उर्फ रिझवी या संशयित आरोपीला कोलकाता येथून अटक करण्यात आली आहे. पैशांचे आमिष आणि पाकिस्तानी नागरिकत्वाच्या लालसेपोटी आरोपीने देशाशी गद्दारी केल्याचा गंभीर आरोप तपास यंत्रणेने केला आहे. या कारवाईमुळे भारतविरोधी हेरगिरी करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पर्दाफाश झाल्याने सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. एनआयएच्या प्राथमिक तपासात आरोपी झफर रियाझ हा २००५ पासून सातत्याने भारत आणि पाकिस्तानदरम्यान संशयास्पद दौरे करत असल्याचे समोर आले आहे. या प्रवासादरम्यान तो पाकिस्तानच्या गुप्तचर अधिकाऱ्यांच्या संपर्कात आला होता. तपासानुसार, त्याला मोठ्या आर्थिक मोबदल्याचे आणि पाकिस्तानचे नागरिकत्व देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. त्याच्या बदल्यात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित महत्त्वाची माहिती गोळा करून ती पाकिस्तानात पोहोचवण्याचे काम त्याच्याकडून करून घेतले जात होते.

देशाच्या अखंडतेला आणि सुरक्षेला थेट आव्हान देणाऱ्या या प्रकरणात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), यूएपीए अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या रॅकेटमागे आणखी कोणते लोक सक्रिय आहेत, देशातील इतर भागांमध्ये याचे जाळे किती पसरले आहे आणि कोणती संवेदनशील माहिती पाकिस्तानला पुरवण्यात आली, याचा सखोल तपास एनआयएचे वरिष्ठ अधिकारी करत आहेत.

## नव्या जलविद्युत प्रकल्पांना विरोध

# गंगा संरक्षणासाठी केंद्राची भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** गंगा नदी आणि उत्तराखंडमधील संवेदनशील हिमालयीन परिसंस्थेच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. वरच्या गंगा नदी खोऱ्यात जलविद्युत प्रकल्पांमुळे पर्यावरणाला होणारे नुकसान हे त्यांच्या आर्थिक फायद्यांपेक्षा कितीतरी जास्त असल्याचे केंद्राने न्यायालयाला सांगितले असून, भविष्यात या भागात कोणत्याही नव्या जलविद्युत प्रकल्पांना परवानगी देऊ नये, अशी मागणी केली आहे.

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात अलकनंदा आणि भागीरथी नदी खोऱ्यात सुरू असलेल्या सात जलविद्युत प्रकल्पांना मात्र कठोर पर्यावरणीय अटींसह पुढे सुरू ठेवण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. यामध्ये टिहरी स्टेज-२ (१,००० मेगावॅट), तपोवन विष्णुगड (५२० मेगावॅट), विष्णुगड पिपलकोटी (४४४ मेगावॅट), सिंग्नोली भटवारी (९९ मेगावॅट), फाटा ब्युंग (७६ मेगावॅट), मदमहेश्वर (१५ मेगावॅट) आणि कालिगंगा या प्रकल्पांचा समावेश आहे. केंद्र सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, गंगा नदी प्रणालीला तिच्या पर्यावरणीय, भौगोलिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे विशेष संरक्षणाची गरज आहे. प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे की, सध्या सुरू असलेल्या सात प्रकल्पांपैकी चार प्रकल्प कार्यान्वित आहेत, तर उर्वरित तीन प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि भौतिक प्रगती झाली आहे. त्यामुळे हे प्रकल्प कठोर पर्यावरणीय नियमांचे पालन करण्याच्या अटीवर सुरू ठेवता येऊ शकतात. केंद्र सरकारने स्पष्ट केले की, या परवानगीसोबत सर्व वैधानिक तरतुदी आणि पर्यावरणीय सुरक्षाविषयक उपायांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असेल. मात्र, उत्तराखंडमधील गंगा नदीच्या वरच्या खोऱ्यात कोणताही नवीन जलविद्युत प्रकल्प मंजूर करू नये, अशी ठाम भूमिका सरकारने घेतली आहे.

२०१३ मधील केदारनाथ आपत्तीनंतर हिमालयीन भागातील जलविद्युत प्रकल्पांमुळे पर्यावरणीय धोके वाढत असल्याचा मुद्दा गंभीरपणे समोर आला होता. त्यात सुमारे ५,००० लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर नदी परिसंस्था, भूस्खलन, पूरस्थिती आणि जैवविविधतेवर जलविद्युत प्रकल्पांचा परिणाम याबाबत व्यापक चिंता व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारने सांगितले की, पर्यावरणाला होणारे नुकसान दीर्घकालीन असून त्याचा परिणाम भविष्यात अधिक गंभीर स्वरूपात होऊ शकतो.

## उच्च न्यायालयांना ऑनलाइन सुनावणीचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरातील सर्व उच्च न्यायालयांना ऑनलाइन सुनावणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले असून बहुतांश न्यायालयांनी त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे, अशी माहिती सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी गुरुवारी दिली. दिल्लीतील सर्व न्यायालयांमध्ये ऑनलाइन सुनावणी सुरू करण्याच्या मागणीवरील याचिकेच्या सुनावणीदरम्यान त्यांनी हे निरीक्षण नोंदवले.

दिल्लीतील सर्व न्यायालये ऑनलाइन पद्धतीने चालवावीत, अशी मागणी करणारी याचिका एका वकिलाने सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर तातडीने सुनावणीसाठी मांडली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, "मी आधीच सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना विनंती केली आहे. बहुतांश न्यायालयांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. वकील आणि न्यायाधीश या दोघांनीही स्वेच्छेने हा निर्णय स्वीकारायला हवा."

याचिकाकर्त्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, राष्ट्रहित लक्षात घेऊन देशातील सर्व जिल्हा न्यायालयांना किमान तीन महिन्यांसाठी ऑनलाइन सुनावणी घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. त्यावर सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, जिल्हा न्यायालये ही संबंधित उच्च न्यायालयांच्या प्रशासकीय अखत्यारीत येतात. त्यामुळे त्या संदर्भातील निर्णय उच्च न्यायालयांनीच घ्यावा. "मी त्यांनाही जिल्हा न्यायालयांबाबत आवश्यक विनंती केली आहे," असे त्यांनी नमूद केले.

पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे वाढणारा खर्च आणि इंधन बचतीचा मुद्दा लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयानेही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

१५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने सोमवार आणि शुक्रवार या दिवशी केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेण्याचा निर्णय जाहीर केला होता. यापूर्वी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना सध्याच्या परिस्थितीत सोमवार आणि शुक्रवार या दिवशी ऑनलाइन सुनावणी घेण्याचे आवाहन केले होते.

## त्या पत्नीला पाचशे रुपयांचा दंड

**नवी दिल्ली :** कौटुंबिक वादातून रागाच्या भरात पतीवर चाकूने वार करून त्याची हत्या करणाऱ्या एका महिलेची शिक्षा तेलंगणा उच्च न्यायालयाने सौम्य केली आहे. न्यायालयाने या महिलेची चार वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा रद्द करत, तिला ५०० रुपये दंड ठोठावून तिची सुटका केली. पतीकडून होणारा छळ आणि वादावादीतून ही घटना घडल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हा निर्णय दिला. ही हत्या पूर्वनियोजित नव्हती, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

## 'यूएलपीजीएम-व्ही ३' क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी; डीआरडीओची झेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या संरक्षण क्षमतेत आणखी मोठी भर घालत संरक्षण संशोधन आणि विकास संस्था डीआरडीओने 'अनमॅन्ड एरिअल व्हेईकल लाँच्ड प्रिसिजन गाईडेड मिसाईल' अर्थात यूएलपीजीएम-व्ही ३ या अत्याधुनिक क्षेपणास्त्राची चाचणी पूर्ण केली आहे.


आंध्र प्रदेशातील कुर्नुल येथे पार पडलेल्या या चाचणीमुळे भारताच्या संरक्षण सज्जतेमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या क्षेपणास्त्राची चाचणी 'एअर-टू-ग्राऊंड' आणि 'एअर-टू-एअर' अशा दोन्ही प्रकारांमध्ये यशस्वी ठरली. ड्रोन आणि लढाऊ हेलिकॉप्टरच्या माध्यमातून शत्रूच्या स्थिर तसेच फिरत्या लक्ष्यांचा अचूक वेध घेण्यासाठी या क्षेपणास्त्राची निर्मिती करण्यात आली आहे. चाचणीदरम्यान अत्याधुनिक एकात्मिक ग्राऊंड कंट्रोल सिस्टीमचा वापर करण्यात आला.

हे क्षेपणास्त्र डीआरडीओच्या हैदराबादस्थित प्रयोगशाळेने विकसित केले असून, पुणे आणि चंदीगड येथील संशोधन शाखांनीही या प्रकल्पात महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतातील एमएसएमई आणि खासगी संरक्षण उद्योगांच्या सहभागातून हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून, भारत डायनामिक्स लिमिटेड आणि अदानी डिफेन्स अँड एरोस्पेस हे याचे उत्पादन भागीदार आहेत.

## मद्रास उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाकडून मागितले उत्तर

# तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत मुलांचा वापर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** २०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीदरम्यान मतप्रचारासाठी मुलांचा कथित वापर केल्याच्या आरोपांप्रकरणी मद्रास उच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण मागितले आहे. राज्यातील सत्ताधारी तमिळगा वेत्री कळघम पक्षासह प्रमुख राजकीय पक्षांविरोधातील आरोपांवर न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. टीव्हीके पक्षाचे नेतृत्व सध्या मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय करत आहेत.

वृत्तानुसार, न्यायमूर्ती जी. आर. स्वामिनाथन आणि व्ही. लक्ष्मीनारायणन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने निवडणूक आयोगाला महत्त्वाचा प्रश्न विचारला की, "भ्रष्ट कारभारासाठी एखाद्या उमेदवाराला अपात्र ठरवता येते, परंतु संपूर्ण राजकीय पक्षालाही अपात्र ठरवता येईल का?" न्यायालयाने या मुद्द्यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे नमूद करत आयोगाला पुढील सूचना सादर करण्याचे निर्देश दिले. ॲडव्होकेट वासुकी यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत टीव्हीकेवर निवडणूक प्रचारात मुलांचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. २१ एप्रिल रोजी वायएमसीए मैदानावर झालेल्या सभेत मुलांना त्यांच्या पालकांच्या मतदान निर्णयावर भावनिक प्रभाव टाकण्याचे आवाहन करण्यात आले होते. तसेच सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडिओंमध्ये मुले आपल्या आई-वडिलांना आणि आजी-आजोबांना विशिष्ट पक्षाला मतदान करण्यासाठी भावनिक दबाव टाकताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, निवडणुकीनंतर विजय यांनी मुलांचे विशेष आभार मानले होते.

याचिकेत विरोधी पक्षांवरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. डीएमकेवर मायलापूर, अलंगुलम आणि तिरुमंगळमसह काही मतदारसंघांमध्ये मतांसाठी पैसे वाटल्याचा आरोप करण्यात आला आहे, तर एआयएडीएमकेवर रोख रक्कम वाटून मतदारांवर प्रभाव टाकल्याचा आरोप आहे.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १२३ आणि १०० यांचा उल्लेख करण्यात आला. कलम १२३ मध्ये लाचखोरी आणि अवाजवी प्रभाव यांसारख्या "भ्रष्ट प्रथा" स्पष्ट करण्यात आल्या आहेत, तर कलम १०० अंतर्गत निवडणूक रद्द करण्याची तरतूद आहे. मात्र, या कायद्याअंतर्गत थेट एखाद्या राजकीय पक्षाला अपात्र ठरवता येते का, हा मुख्य कायदेशीर प्रश्न न्यायालयासमोर उपस्थित झाला. याचिकेत निवडणूक आयोगाच्या आधीच्या मार्गदर्शक तत्त्वांचाही उल्लेख करण्यात आला आहे. २००९, २०१३ आणि २०१४ मधील सूचनांमध्ये प्रचार, सभा किंवा निवडणूक प्रक्रियेत मुलांचा सहभाग टाळण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. २०१७ च्या आदेशातही निवडणुकीशी संबंधित कोणत्याही प्रक्रियेत मुलांचा वापर होऊ नये, असे नमूद करण्यात आले होते.

याचिकाकर्त्यांनी दावा केला आहे की, सार्वजनिकरीत्या उपलब्ध व्हिडिओ आणि माध्यमांतील अहवाल असूनही निवडणूक आयोग आणि तामिळनाडूच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी या प्रकरणात कोणतीही प्रभावी किंवा पारदर्शक चौकशी सुरू केलेली नाही, असे म्हटले आहे.